दूरध्वनी : २५३३ १२११
२५३३ १५९०

# ठाणे महानगरपालिका , ठाणे.

महापालिका भवन , सरसेनानी जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग , चंदनवाडी , पांचपाखाडी, ठाणे - ४००६०२
THE MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE

## ठाण्यात रँलीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी दिला मतदान जनजागृतीचा संदेश
## 92 शाळांतील विद्यार्थ्याचा रँलीत उत्स्फूर्त सहभाग

ठाणे (23): मतदानासाठी अवघे काही दिवस शिल्लक राहिले आहे. २९.एप्रिल रोजी होत असलेल्या मतदानाचा हक्क जास्तीत जास्त नागरिकांनी बजावावा यासाठी ठाणे, कल्याण लोकसभा मतदार संघात निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात येत आहे.
आज ठाणे व कल्याण लोकसभा मतदार संघाअंतर्गत येत असलेल्या विधानसभा मतदार संघातील विविध ६८ ठिकाणी नागरिकांमध्ये रँलीच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली. या जनजागृती मोहिमेत विविध प्रभागातील ९२ शाळा सहभागी झाल्या होत्या.

तसेच सर्व शाळांमधील शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या पालकांना एसएमएसच्या माध्यमातून देखील मतदान करण्याचे आवाहन करणार असल्याचे ठाणे महापालिकेच्या शिक्षण विभागाचे उपायुक्त मनिष जोशी यांनी नमूद केले. तसेच शाळांच्या निकालाच्या तसेच ओपन डे दिवशी देखील पालकांमध्ये जनजागृती करण्यात येणार आहे.

आज ठाणे व कल्याण लोकसभा अंतर्गत भव्य प्रमाणात काढण्यात आलेल्या रँलीचे नेत्तत्व महापालिकेच्या सर्व प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. चारुशीला पंडित, अनुराधा बाबर, विजयकुमार जाधव, महेश आहेर,मारुती गायकवाड , शंकर पाटोळे , महादेव जगताप , झुंजार परदेशी आदींनी केले होते. या रँलीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.